क्र. १६१ पहिले वर्ष

०३ सप्टेंबर २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील बाविसावा रविवार

### प्रस्तावना

प्रभू येशू ख्रिस्ताने मानवाचे देवाबरोबर नातेसंबंध पुन:प्रस्थापित करण्यासाठी त्याग आणि आत्मबलिदान केले. त्यांच्या दु:खसहन व क्रूसावरील बलिदानामुळेच पुनरुत्थानाचे वैभव प्राप्त झाले. आपल्या जीवनातील सर्व दु:खे, आजार, अडचणी, अपयशाचा वधस्तंभ उचलून प्रभू येशूला अनुसरणे हेच खरे ख्रिस्तानुकरण आहे. वधस्तंभ हा त्यागाचे, प्रेमाचे, सेवेचे, क्षमेचे आणि आत्मबलिदानाचे प्रतीक आहे. आपल्या जीवनातील संकटे व क्रूस आपण स्वीकारावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

सर्वसमर्थ परमेश्वरा, सर्व चांगल्या गोष्टींचा तू उगम आहेस. आमच्या अंत:करणात तुझ्याविषयी प्रेम निर्माण कर. आमची श्रध्दा वाढव. तुझी कृपादृष्टी आम्हावर सतत राहू दे. तू आम्हांला दिलेली वरदाने आम्हापाशी कायम ठेव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यिर्मया या पुस्तकातून घेतलेले वाचन २०:७-९**

**"दिवसभर परमेश्वराचे वचन माझ्या निंदेला कारण झाले आहे."**

हे परमेश्वरा, तू मला फसवले आणि मी फसलो, तू माझ्यापेक्षा प्रबळ असल्यामुळे विजयी झालास. मी दिवसभर हसण्याचा विषय झालो. जो तो माझा उपहास करतो. कारण मी बोलू लागलो की, "जुलूम, लूट" हे शब्द मला उच्चारावे लागतात आणि दिवसभर परमेश्वराचे वचन माझ्या निंदेला आणि अप्रतिष्ठेला कारण झाले आहे. मी म्हणालो, "मी त्याचे नाव काढणार नाही, यापुढे मी त्याच्या नावाने बोलणार नाही." तेव्हा माझ्या हाडात कोंडलेला अग्नी जळत आहे जसे माझ्या हृदयाला झाले. मी स्वत:ला आवरता थकलो, पण मला ते आवरेना.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### प्रतिसाद स्तोत्र

**६:२,३-४,५-६,८-९**

प्रतिसाद: **हे माझ्या देवा, माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे.**

१. हे देवा, तू माझा देव आहेस, मी आस्थेने तुझा शोध करीन. शुष्क, रुक्ष आणि निर्जल प्रदेशात माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला आहे, माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.

२. अशा प्रकारे तुझे बळ आणि वैभव पाहण्यास पवित्रस्थानी मी तुझ्याकडे दृष्टी लावली आहे. तुझे वात्सल्य माझ्या प्राणाहून उत्तम आहे. मी ओठ तुझे स्तवन करतील.

३. मी जिवंत आहे तोपर्यंत तुला असाच धन्यवाद देईन, तुझ्या नामाने मी आपले हात उभारीन. मज्जेने आणि मेदाने व्हावा तसा माझा जीव तृप्त होईल, माझे मुख हर्षभरीत होऊन तुझे स्तवन करील.

४. कारण तू माझे साहाय्य होत आला आहेस,म्हणून तुझ्या पंखांच्या सावलीत मी आनंद करीन. मी तुझी कास धरली आहे, तुझा उजवा हात मला सांभाळून धरतो.

### दुसरे वाचन

**पौलचे रोमकरांस पत्र वातून घेतलेले वाचन १२:१-२**

**"तुम्ही आपली शरीरे जिवंत यज्ञ म्हणून समर्पण करा."**

बंधुजनहो, मी देवाच्या करुणेमुळे तुम्हाला विनवतो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र आणि देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावी. ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहणीय आणि परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे. म्हणून या युगाबरोबर समरूप होऊ नका. तर आपल्या मनाच्या नूतनीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ६:५१**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, स्वर्गातून उतरलेली मी जिवंत भाकर मीच आहे, ही भाकर जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १६:२१-२७**

**"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वत:चा त्याग करावा."**

येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना सांगू लागला की, मी यरुशलेमला जाऊन वडील, मुख्य याजक आणि शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ दु:खे सोसावी, जिवे मारले जावे आणि तिसऱ्या दिवशी उठवले जावे ह्याचे अगत्य आहे. तेव्हा पेत्र त्याला जवळ येऊन त्याचा निषेध करून म्हणाला, "प्रभो, आपणावर दया असो, असे आपल्याला होणारच नाही." तेव्हा तो वळून पेत्रला म्हणाला, "अरे सैताना, माझ्यापुढून निघून जा, तू मला अडखळणे आहेस कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे

लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे.''

मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वत:चा त्याग करावा आणि आपला क्रूस उचलून घेऊन मला अनुसरावे. कारण जो कोणक्ष आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरिता आपल्या जिवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जिवाबद्दल काय मोबदला देणार? मनुष्याचा पुत्र आपल्या पित्याच्या गौरवानिशी आपल्या दूतांसह येईल त्यावेळी तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे फळ देईल.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद – **ऐक प्रार्थना प्रभू देवा.**

१. ख्रिस्तमंडळाची सेवा करणाऱ्या आपल्या पोप, बिशप्स, धर्मगुरू, धर्मभगिनींना आपले कार्य करण्यास भरपूर कृपा मिळावी व मानसिक सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. आपल्या देशातील सर्वत्र चाललेली अंधाधुंदी, भ्रष्टाचार यांचे निर्मूलन व्हावे व सर्वत्र न्यायाचे, सलोख्याचे व शांतीचे राज्य स्थापन व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. जे लोक आजारी, दु:खी-कष्टी आहेत अशांना आपल्या आजारात परमेश्वराचा आधार मिळावा व ते आजारातून बरे व्हावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आता आपण शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

**समारोप**

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, या पवित्र समर्पणाद्वारे तुझा आशीर्वाद आम्हाला दे व आम्हामधील तुझे तारणकार्य पूर्ण कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, जीवनाच्या भाकरीने तू आम्हांला नवजीवन देतोस. या भाकरीने तुझ्यावरील आमची भक्ती वाढव आणि जनसेवेद्वारे तुझी सेवा करण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

परमेश्वराचे मार्ग मानवाच्या मागापेक्षा व त्याच्या योजना मानवाच्या योजनांपेक्षा भिन्न असतात. आजच्या पहिल्या वाचनात (यिर्मया २०:७-९) यिर्मया संदेष्ट्याला परमेश्वराचा शब्द घोषित करण्याची उत्कंठा लागलेली दिसून येते. परमेश्वराच्या शब्दामुळे सर्वत्र शांती पसरेल असे त्याला वाटत होते. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याला सर्वत्र हिंसा आणि विनाश होत असल्याचे दिसून आले. तरीही तो परमेश्वराचे वचन घोषवित राहतो. हाच परमेश्वराचा शब्द आपल्याला ह्या जगाशी समरस होण्यापेक्षा नव्या युगासाठी आपल्या मनाचे नूतनीकरण करण्याचे आवाहन करीत असल्याचे दुसऱ्या वाचनात आपल्याला सांगण्यात आलेले आहे (रोम.१२:१-२).

मात्र आपल्या मनात येणारे विचार परमेश्वरांकडून येतात की सैतानाकडून येतात ह्याची खातरजमा माणसाने सतत करायची असते असे येशू आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १६:२१-२७) आपल्याला शिकवितो. पेत्राने येशू हा ख्रिस्त आहे, अशी कबुली देताच 'मांस आणि रक्त ह्यांनी नव्हे तर माझ्या स्वर्गातील पित्याने तुला हे प्रकट केले आहे, असे येशूने जाहीर केले; आणि त्याला भक्कम खडकाची उपमा दिली. मात्र मसिहा (ख्रिस्त) म्हणून येशूला जे दु:ख सोसावे लागणार होते त्याचे सुतोवाच करताच पेत्र म्हणाला, ''प्रभूजी, आपणावर दया असो, आपल्याबाबतीत असे होणारच नाही.'' इथेही येशूने सैतानाची वाणी ओळखली आणि त्याने पेत्राला 'आपल्या मार्गातील धोंड' अशी उपमा दिली.

**आत्मपरीक्षण :** परमेश्वराच्या योजना व त्याची वाणी ओळखून माझ्या जीवनाचे नूतनीकरण करण्यासाठी मी कोणकोणती पावले उचलत असतो? ●●●

| सप्टेंबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचन | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०४ | सं रोसालीया (हि) | : १ थेस्सलनी ४:१३-१८/लूक ४: १६-३० |
| मंगळ ०५ | सं मदर तेरेसा (हि) | : १ थेस्सलनी ५:१-६, ९-११/लूक ४:३१-३७ |
| बुध ०६ | सं एलेयुथेरिअस (हि) | : कलस्सैकरांस १:१-८/लूक ४ : ३८-४४ |
| गुरू ०७ | सं क्लॉड (हि) | : कलस्सैकरांस १:९-१४/लूक ५:१-११ |
| शुक्र ०८ | पवित्र मरियेचा जन्मदिन सोहळा (पां) | : रोम.८:२८-३०/मत्तय १: १-१६, १८-२३ |
| शनि ०९ | पीटर क्लेवर (हि) | : कलस्सैकरांस १:२१-२३/लूक ६:१-५ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)